imma™

# Maharashtra Times (Mumbai Times)

## AGNEE

**Date: 05-06-2007 | Edition: Mumbai | Page: 3 | Source: Bureau | Clip size (cm): W: 4 H: 15**

**Clip: 1 of 1**

### अग्नी

द न्यू फेस ऑफ इंडी-रॉक अशी जाहिरात करून मोहन, अरिजित आणि कोको यांच्या अग्नी बॅण्डने आपला पहिलावहिला आल्बम काढला आहे. खूप




दिवसांनी अशा प्रकारे इंडी-रॉक गटात मोडणारा आल्बम आलाय. अर्थात, हे प्रकरण जरा वेगळं आहे, असं म्हणून त्याच्याकडे पाठ फिरवण्याची गरज नाही. 'साधो रे' गाणं सध्या चॅनल्सवरून दाखवलं जातंय, त्यावरून हे प्रकरण समजायला खूप काही कठीण नाही, असं जाणवतं. क्लासिक रॉक, हिंदुस्तानी आणि कर्नाटक संगीत आणि जॅझ यांच्या मिक्सचरमधून यांचं संगीत जन्माला आलं आहे. त्यामुळे अनेकांना ते नक्कीच आवडू शकेल. 'शाम तन्हा', 'उजाले बाझ' ही गाणी ऐकतानाच हा प्रकार खूप छान वाटून जातो. विशेषतः 'उजाले बाझ' हे विशेष म्हणता येईल. 'कारवा', 'कुछ आँखे', 'कह लेने दे' अशी गाणी आपल्याला वेगळा आनंद देऊन जातील. खरं तर ताज्या दमाचं संगीत असं म्हणता येईल. भारतात रॉक बॅण्डची सर्वसामान्य लोकांना आवडतील अशी गाणी देणारी मंडळी फार थोडीच आहेत. त्यामुळे त्याचं स्वागत करायलाच हवं.

*सोनी बीएमजी*